# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ३६४–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| मे. निवास स्पिनींग मिल्स लि.<br>अे–५, अे–८, एम.आय.डी.सी. चिंचोळी , सोलापूर. | अर्जदार |

**विरुध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, सोलापूर<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>ग्रामीण विभागीय कार्यालय, सोलापूर<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>ग्रामीण उप विभाग १ कार्यालय, सोलापूर | विरुध्द पक्षकार |

## अंतरिम आदेश

श्री. व्ही. आर. जाजू, मॅनेजिंग डायरेक्टर, मे. निवास स्पिनींग मिल्स लि. अे–५, अे–८, एम.आय.डी.सी. चिंचोळी, सोलापूर हे वितरण कंपनीचे ग्राहक आहेत. त्यांचा ग्राहक क्रमांक एचटी–३३१५१९००४८९१ असा आहे. कंपनीचे एम.डी. श्री. जाजू यांचेमार्फत मंचामध्ये अनुसूची अ मध्ये तक्रार दाखल केली. त्यामध्ये वि.प.च्या सोलापूर मंडल कार्यालयाने नोटीस क्र. ३८१८ दि. १८.६.२०१० रोजी रु. ८,२०,६००/– सुरक्षा ठेव रकमेची मागणी केली. ग्राहकाच्या म्हणण्यानुसार ही मागणी बेकायदेशीररित्या केली असल्याने त्यांनी कंपनीकडे दि. १२.६.२०१० ला अर्ज केला व त्या पुष्ट्यर्थ या मंचाचा दि. २०.८.२००९ चा तक्रार क्र. ४४/२००९ च्या आदेशाचा आधार घेतला आहे. त्यामध्ये सप्लाय कोडच्या ११.२ कलमाप्रमाणे मागील १२ महिन्याच्या देयकांची सरासरी सुरक्षा ठेव रक्कम काढण्यासाठी आधार घेतला आहे. या ठिकाणी तसे न करता दि. २०.११.२०१० ला नोटीस देवून अतिरिक्त सुरक्षा ठेव रकमेची मागणी केलेली आहे. या अर्जास कारण वि.प.ने दि. २३.१२.२०१० ला नोटीस देवून पैंसे न भरल्यास विद्युत पुरवठा खंडित करण्यात येत आहे असे कळविले आहे. ग्राहकाने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सोलापूर येथे तक्रार दाखल केली व वि.प.च्या नोटीस मधील कारवाईस स्थगिती मिळण्याची मागणी केली आहे. मंचाने दि. ६.१.२०११ ला पुढील सुनावणी होईपर्यंत विद्युत पुरवठा खंडित न करण्याचे कंपनीस आदेश दिले.

प्रस्तुतची तक्रार सुनावणीस मंचासमोर घेतली असतां, वि.प.चे नोडल ऑफीसर श्री. प्रसाद. श्री. वाघ उपस्थित. ग्राहक प्रतिनिधी श्री. संजय शिरसाट उपस्थित. त्यांनी लेखी म्हणणे ( arguments) दाखल केले. मंचाने त्यांचा युक्तिवाद ऐकला. वि.प.ने तोंडी युक्तिवाद झाल्यानंतर लेखी अहवाल दिला. त्यामध्ये ग्राहकाकडे मागणी केलेली अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम रु. ८,२०,६००/– भरुन घेणे आवश्यक आहे, कारण यापूर्वी ग्राहकाची वि.प.कडे रु. १४,९६,०००/– इतकी सुरक्षा ठेव असून ती रु. २३,१६,६००/– असणे गरजेचे आहे. आपल्या तक्रारीसोबत एप्रिल ते डिसेंबर २०१० च्या देयकांचा तक्ता जोडला आहे. या उलट, श्री. शिरसाट यांनी लेखी म्हणण्यामध्ये उल्लेख केलेली कारणे देवून विद्युत पुरवठा खंडित होवू नये व सप्लाय कोडच्या ११.२ कलमामधील तरतुदीनुसार यापूर्वी मंचाच्या दि. २०.८.२००९ चा तक्रार क्र. ४४/२००९ च्या आदेशाप्रमाणे योग्य ती सुरक्षा ठेव रक्कम भरण्यास वाजवी मुदत द्यावी अशी विनंती केली आहे.

वरील विवेचनावरुन खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होत आहे.

१) ग्राहक तक्रारदार यांनी मागणी केल्याप्रमाणे वि.प.ची अतिरिक्त सुरक्षा ठेव रु. ८,२०,६००/– मागणी नोटीस मधील कारवाईस स्थगिती देणे योग्य होईल काय ?

उत्तर : नाही

<u>कारणमिमांसा</u>

उभयबाजूंच्या कथनानुसार अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम कुठल्या पध्दतीने मागणी करावयाची याबाबत वाद आहे. ग्राहक प्रतिनिधींनी मंचाचे पूर्वीचे आदेश किंवा वापरलेल्या विजेच्या युनिटसची रक्कम विचारांत घेता रु. ३,३६,०००/– अतिरिक्त सुरक्षा ठेव भरण्याची तयारी दर्शविली आहे. या उलट, वि.प.ने मागणी केलेली रु. ८,२०,६००/– ही रक्कम वाजवी व योग्य आहे असे सांगितले.

वितरण कंपनीने ग्राहकाच्या वीज वापराचा एप्रिल २०१० ते डिसेंबर २०१० पर्यंतचा तक्ता मंचासमोर हजर केला. त्यामध्ये विजेचा वापर युनिटप्रमाणे व त्या अनुषंगाने दिलेली बीले याचाही विचार करता, विनियमातील तरतुदीनुसारच रक्कम भरावी लागली तरी ती अंदाजे रु. २१,००,०००/– ते रु.२२,००,०००/– दरमहा येत आहे असे नमूद केले आहे. सदरच्या अतिरिक्त सुरक्षा ठेव रकमेची मागणी वि.प.ने जून २०१० मध्ये नोंदविली आहे. ग्राहक प्रथमत: अंतर्गत कक्षामध्ये व नंतर मंचासमोर अंतरिम स्थगितीसाठी दि. २९.१२.२०१० ला दाखल झाला आहे. ग्राहकास अतिरिक्त रक्कम भरावी लागणार हे निश्चित आहे. तथापि, पत्र–व्यवहाराच्या वादात भरावी लागणारी रक्कम भरण्यास विलंब झाला आहे. त्यामुळे मंचाचे असे मत झाले आहे की, वि.प.ने मागणी केलेली रक्कम रु. ८,२०,६००/– अथवा ग्राहकाने भरण्याची तयारी दाखविलेली रक्कम रु. ३,३६,०००/– या बाबतचा निर्णय प्रथमत: अंतर्गत कक्ष स्तरावर घेवूनच नंतर मंचासमोर येणे उचित आहे. तथापि उभयतांनी नोंदविलेल्या रकमा, वि.प.ने प्रत्यक्षात दिलेली आकडेवारी, युनिटची सरासरी, चालू टेरिफ रेट व ग्राहकास दिलेल्या १२ महिन्यांच्या देयकाची सरासरी यानुसार सादर केलेली आकडेवारी यामध्ये सारासार विचार करतां, त्यामध्ये तफावत असल्याने ही आकडेवारी बारकाईने तपासणे आवश्यक असलेने तूर्तातूर्त ग्राहकाने मंचाचा आदेश मिळाल्यानंतर १० दिवसांचे आंत रु. ५,००,०००/–( रु. पाच लाख फक्त) वि.प.कडे अतिरिक्त सुरक्षा ठेव म्हणून जमा करावेत, तसे वि.प.नेही ग्राहकास कळवावे. ग्राहकाने भरणा न केल्यास वसुलीसाठी आवश्यक ती नियमाप्रमाणे कारवाईचा वि.प.स अवलंब करता येईल. त्याचप्रमाणे अंतर्गत कक्षाकडे दाखल सदर तक्रारीचा निर्णय कक्षाने सत्वर म्हणजे ३१ जानेवारी २०११ पर्यंत करावा असा मंच आदेश देत आहे.

## आदेश

१) तक्रार अंशत: मंजूर करणेत येत आहे.

२) ग्राहकाने सुरक्षा रक्कम ठेव म्हणून रु. ५,००,०००/– ( रु. पाच लाख फक्त ) वि.प.कडे आदेश मिळाल्या तारखेपासून १० दिवसांचे आंत भरावी. ग्राहकाने सदर रक्कम १० दिवसांचे आंत न भरलेस प्रस्तुतचा अंतरिम आदेश रद्द समजणेत यावा.

३) नोडल ऑफीसर, अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सोलापूर यांनी ग्राहकाच्या तक्रारीवर कुठल्याही परिस्थितीत दि. ३१.१.२०११ पर्यंत नियमाप्रमाणे निर्णय करावा.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक :

| | | |
|---|---|---|
| जी. सी. लेले | जी.बी. पानकर | बी. जी. पवार |
| सदस्य | सदस्य सचिव | अध्यक्ष |
| ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर | ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर |